महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
**जनसंपर्क विभाग**
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व,
मुंबई – ४०००५१. ☎ ०२२-६६४०५०६६/७७.
ईमेल : cpromhadaoffice@gmail.com

म्हाडा
MHADA

==============================================================

जावक क्रमांक –०८/३०५६९३४ दिनांक :- ०८ फेब्रुवारी, २०२६

प्रसिद्धिपत्रक

# म्हाडा पुणे मंडळातर्फे ४१८६ सदनिकांच्या विक्रीसाठी १० फेब्रुवारी रोजी संगणकीय सोडत

४१८६ सदनिकांसाठी २,१५,९६५ अर्ज प्राप्त

मुंबई, दि. ०८ फेब्रुवारी, २०२६ :- म्हाडाचा विभागीय घटक पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे पुणे, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका व पीएमआरडीएसह सोलापूर, कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील विविध गृहनिर्माण प्रकल्पांतील ४१८६ सदनिकांच्या विक्रीसाठी मंगळवार, दि. १० फेब्रुवारी, २०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता पुणे मंडळाचे सभापती श्री. शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या हस्ते संगणकीय सोडत काढण्यात येणार आहे.

पुणे जिल्हा परिषदेच्या मा. शरदचंद्र पवार सभागृहात सदर सोडतीचा कार्यक्रम होणार असून 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल (भा.प्र.से.) हे दूरदृश्य प्रणालीद्वारे (व्हिडीओ कॉन्फरेंसिंग) या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. ४१८६ सदनिकांसाठी एकूण २,५८,८३२ अर्ज प्राप्त झाले आहेत, त्यातील २.१५,९६५ अर्जदारांनी अनामत रकमेचा भरणा केलेला असून त्यांचा सोडतीमध्ये समावेश करण्यात आलेला आहे. पुणे मंडळाच्या या सोडतीला अर्जदारांनी भरघोस प्रतिसाद दिला आहे.

पुणे मंडळातर्फे सोडतीसाठी दि. ११ सप्टेंबर २०२५ रोजी ४१८६ सदनिकांच्या विक्रीसाठी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली. पुणे, पिपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील तसेच पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अंतर्गत २० टक्के सर्वसमावेशक योजनेतील ३३२२ सदनिकांचा आणि १५ टक्के सामाजिक गृहनिर्माण योजनेतील ८६४ सदनिकांचा सोडतीत समावेश करण्यात आला आहे. अर्जदारांच्या विनंतीनुसार, काही तांत्रिक अडचणी व निवडणूक आचारसंहिता या कारणांमुळे अर्ज भरण्यासाठी दोनदा मुदतवाढ देण्यात आली होती.

सदर सोडतीच्या निमित्ताने सर्व अर्जदारांना आवाहन करण्यात येते की , अर्जदारांनी मंगळवार, दि. १० फेब्रुवारी, २०२६ रोजी सोडतीच्या कार्यक्रमाला उपस्थित रहावे, ज्या अर्जदारांना प्रत्यक्ष कार्यक्रमस्थळी उपस्थित राहणे शक्य नाही त्यांना त्यांच्या नोंदणीकृत भ्रमणध्वनी क्रमांकावर प्राप्त संदेशामध्ये मिळालेल्या YouTube URL https://youtube.com/live/QTmRzDT_NbA?feature=share वरुन सोडतीचा कार्यक्रम ऑनलाईन थेट घरबसल्या बघता येणे शक्य आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

###

(स्वाक्षरीत/-)
(वैशाली गडपाले)
**मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा**

---